पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -३५३ दिनांक - १२/०५/२०२३**

## युनिट-३, गुन्हे शाखा,पुणे शहर

## आपले कब्जात एक गावठी कट्टा व ०२ जिवंत काडतुसे बाळगणा-या सराईत गुन्हेगारास केले जेरबंद

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर, मा.पोलीस सह आयुक्त व अपर पोलीस आयुक्त,गुन्हे पुणे शहर यांनी पुणे शहरातील गुन्हेगारी नष्ट व्हावी व गुन्हयांना प्रतिबंध व्हावा याकरीता पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार यांना चेक करुन त्यांचेविरुध्द प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत आदेशीत केले आहे.

वरिष्ठांचे आदेशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.श्रीहरी बहिरट यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, युनिट-३ चे पथक दि.११/०५/२०२३ रोजी वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत फिरत असताना,**सहा.पो.फौज.क्षिरसागर**, **पोलीस अंमलदार,राजेंन्द्र मारणे** यांना मिळालेल्या बातमीवरुन रेकॉर्ड वरील गुन्हेगार **निलेश भाऊराव काळे,वय-२५ वर्ष,रा.स.नं. ५३,संतोषीमाता नगर,काळेपडळ,हडपसर,पुणे** यांस कर्वेनगर भाजी मार्केट विठ्ठल मंदीरावरील कट्टयावर वारजे,पुणे येथुन ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातून देशी बनावटीचे ०१ पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे असा एकूण ४०,८००/- रुपयेचा माल हस्तगत करण्यात आला असून,त्याचे विरुध्द **वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे येथे गु.र.नं.१९०/२०२३,आर्म ॲक्ट कलम ३(२५),महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३)१३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमूद आरोपीत हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन त्यांचे विरुध्द मुंढवा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. त्याच्याकडे मिळुन आलेल्या पिस्टल बाबत तपास करता,त्याने सदरचे पिस्टल मित्रामध्ये दहशत निर्माण करण्यासाठी बाळगले असल्याचे सांगितले.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,श्री. अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,पुणे शहर,श्री.सुनिल पवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-३ चे प्रभारी अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्रीहरी बहिरट, पोलीस उप-निरीक्षक,अजितकुमार पाटील, राहुल पवार, सहा.पो.फौ. संतोष क्षिरसागर, पोलीस अंमलदार, राजेंद्र मारणे, शरद वाकसे, किरण पवार, सुरेंद्र साबळे, सुजीत पवार, संजिव कळंबे, सतिश कत्राळे, प्रताप पडवाळ, ज्ञानेश्वर चित्ते, प्रकाश कट्टे, साईनाथ पाटील, गणेश शिंदे, सोनम नेवसे, भाग्यश्री वाघमारे यांचे पथकाने केली आहे.